SHODH-VIDNYAN-KOSH : A DICTIONARY OF RESEARCH, ITS METHODOLOGY, SCHOLARSHIP & PHILOSOPHY - MARATHI

शोधविज्ञान कोश

संशोधनविषयक व शोधसमान कार्य व कृतीशी संबद्ध अशा सर्वसाधारण विविध संज्ञा, संकल्पना, प्रक्रिया, पद्धती, तत्त्वमीमांसा, संदर्भ इत्यादींचा सर्वसंग्राहक.

संदर्भ ग्रंथ

प्रकल्पन व लेखन

डॉ. द्. का. संत
M.A., PH.D.
कोल्हापूर

। परिचय पुस्तिका । । फेब्रुवारी-१९७८ ।

शोध विज्ञान कोश
परिचय पुस्तिका

प्रकाशक :
सौ. मीरा द. संत
संकेत, ९३, शिवाजी पार्क
कोल्हापूर ४१६००१

मुद्रक :
गो. वा. कुलकर्णी
मेघा मुद्रणालय
[illegible] ई वॉर्ड, कोल्हापूर

SHODH-VIDNYĀN KOSH
A DICTIONARY OF RESEARCH SCIENCE
[MARATHI]
by Dr. D. K. SANT

शोधविज्ञान कोश

एक संदर्भ ग्रंथ

ले. : डॉ. दु. का. संत

सूचना व अभिप्रायार्थ,
-सप्रेम भेट-

योजना व रूपरेषा

'**शोधविज्ञान कोश**' असा एक कोशग्रंथ तयार करण्याचे काम मी हाती घेतले आहे. संबंधित व औत्सुक्य असणारांसाठी त्याची कल्पना व योजना या ठिकाणी सादर करीत आहे.

आवश्यकता – मराठीत अशा प्रकारच्या ग्रंथाची आज अत्यंत गरज आहे, असे मला वाटते. माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणाचा तोंडवळा बदलत आहे. त्याचे स्वरूप कसे असावे याबद्दल वादविवादाला जागा असली तरी यापुढचे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षण हे प्राय: संशोधनानुगामी राहाणे हे केवळ अपरिहार्य आहे. ते आवश्यकही आहे. द्वितीय पदवीनंतर एम्. फिल्., एम्. लिट्. यांसारख्या पदव्या येऊ घातलेल्या आहेत. संशोधनपद्धतींची प्रत्यक्ष कल्पना देण्यासाठी काही पदविका अभ्यासक्रमही काही ठिकाणी विचाराधीन आहेत. याचा अर्थ संशोधनशास्त्र वा शोधविज्ञान हा यापुढे महत्त्वाचा विषय होत आहे. संशोधन ही महत्त्वाची अभिक्रिया म्हणून मान्यता पावत आहे.

तसेच सर्वत्र निरनिराळे संशोधनप्रकल्प हाती घेतले जात आहेत प्रबंध लिहिले जात आहेत, पाहाण्या, सर्वेक्षण, अभ्यास इ. उपक्रम विविध अभ्यास-गटांतर्फे चालू आहेत. ह्या सर्व गोष्टींना उपयुक्त होईल असा संदर्भग्रंथ आवश्यक आहे, असे वाटल्यावरून मी हा उपक्रम हाती घेतला आहे. हा ग्रंथ सर्वसंग्रहस्वरूप आहे, त्यासाठी कोशविशेष अशी अकारविल्हे पद्धती मी स्वीकारली आहे.संशोधन करीत असताना शोधाध्यायींना थोडे मार्गदर्शन व विविध संदर्भ यांची आवश्यकता भासते. संशोधन-मार्गदर्शक, हा मार्गदर्शन करीत असतो. त्याचे मार्गदर्शन विषयसापेक्ष असते. शोधतंत्रासंबंधी त्याने पुष्कळशा गोष्टी गृहित धरलेल्या असतात, म्हणजे विद्यार्थ्याला त्यांचे ज्ञान आहे, असे त्याला वाटत असते. प्रत्यक्षात ती माहिती मिळविण्यात फार वेळ जातो. कारण ती कोठे मिळेल हे माहित नसते, त्यामुळे अध्यायीची फार कुचंबणा होते. वस्तुत: संशोधन ही अशी अभिक्रिया (अॅक्टिव्हिटी) आहे की, तिच्यात अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. त्या तशा परस्परसंबद्ध असतात, पण स्वतंत्रपणेही अभ्यास्य असतात. त्यांना स्वत:चे असे महत्त्व आहे. तसेच त्या एकस्वरूपी नाहीत. काही बौद्धिक, काही कार्योपयोगी, काही उपायशोधनपर, काही तात्त्विक, तर काही तांत्रिक अशा आहेत. याचा अर्थ विशिष्ट क्रमानेच त्यांचा अभ्यास करावा असे नाही. गरज, औत्सुक्य याप्रमाणे त्यांचा केव्हाही स्वतंत्रपणे अभ्यास करता येतो. सहाजिकपणे त्यांची मांडणी अकारविल्हे किंवा वर्णानुक्रमाने करणे अधिक योग्य, म्हणून कोशपद्धती त्यादृष्टीने सोयीची वाटली. संदर्भग्रंथ म्हणून प्राय: लेखन करीत असल्याने कोशपद्धतीचे अवलंबन योग्य वाटले.

दुसरे असे की, संशोधनासाठी विविधप्रकारचे मार्गदर्शन लागत असते, काही संदर्भ सतत लागत असतात. ते सहजासहजी उपलब्ध असतातच असे नाही. त्यांचा पुन: पुन उपयोग करावा लागतो. संशोधकाची ही निकड लक्षात

घेऊन त्याच्या विविध प्रकारच्या गरजा पूर्ण होतील अशा दृष्टीने या कोशग्रंथाची रचना करण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे संशोधनाच्या कोणत्याही अवस्थेत तो उपयुक्त ठरावा अशी अपेक्षा असल्याने कोशस्वरूप सोयीचे वाटले. विशिष्ट ज्ञानक्षेत्र किंवा अभ्यासविषय विचारात घेऊन त्या त्या क्षेत्रातले संशोधन करताना कोणत्या तंत्रपद्धतींचा, गोष्टींचा अवलंब करावा, त्यावेळी कोणती दक्षता घ्यावी इ. गोष्टी विचारात घेऊन या विषयावरची पुस्तके सामान्यतः तयार केलेली असतात. त्या दृष्टीने ती उपयुक्त असतात. त्यांचे महत्त्व पूर्णपणे अबाधित आहे.

प्रस्तुत लेखकाची अशी धारणा आहे की, प्रत्येक ज्ञान वा व्यासंगक्षेत्रातल्या संशोधनाच्या भूमिका, तंत्रात्मक पद्धती, अंगे, विवेचन-स्वरूप इ. बाजी त्या त्या विषयाच्या स्वरूपाप्रमाणे वेगवेगळ्या असल्या तरी **सर्व ज्ञानशाखांना उपयुक्त होईल असे शोधविद्येचे समान ज्ञान बरेच आहे.** ते उपेक्षणीय नाही, ते मिळविल्यानंतर किंवा त्याची परिपूर्ण ओळख करून घेतल्यानंतरच विशिष्ट विषयनिविष्ठ अशी शोधतंत्रे महत्त्वाची ठरतात. ज्ञानक्षेत्रात आज आंतरअनुशासनाधिष्ठिततेला (इंटरडिसिप्लिनरी रिलेशनशिप) जे महत्त्व दिले जाते, त्याच्याशी ही भूमिका सुसंगत अशीच आहे. संशोधनक्षेत्रात नव्याने प्रवेश करणाऱ्या अध्येत्याची या बाबतीतली अनभिज्ञताही लक्षात घ्यावयास हवी.

त्या शिवाय विविध प्रकारची माहिती, तंत्रे, प्रणाली, शोधांगे, ही एकदम आत्मसात करण्यासारखी असतात असे नाही. ती आत्मसात करण्याची एक प्रक्रिया असते, प्रत्येक व्यक्तीची ती स्वतंत्र असते. काही माहिती, संदर्भ वा विवेचन पुनः पुनः लागते. हे सारे लक्षात घेऊनच हा कोशस्वरूप ग्रंथाचा उपक्रम हाती घेतला आहे. लेखकाची ही भूमिका समजल्यानंतर तिचे औचित्य पटेल.

विविध विषय– कोशग्रंथाचे उद्दिष्ट व भूमिका स्पष्ट केल्यानंतर शोधक्रियेशी संबद्ध अशा किती विविध प्रकारच्या विषयांवरील नोंदी ऊर्फ लेखन ह्यात समाविष्ट होणार आहे ह्याची कल्पना येण्यासाठी, त्यांच्यांपैकी काही प्रवर्गांचा (कॅटॅगरीज) व विषयांचा उल्लेख करतो :–

१) संशोधनाला उपयुक्त अशा शोधपद्धतिशास्त्राशी (मेथॉडॉलॉजी) संबद्ध असणारे विषय : उदा. पदटीपा (फूटनोट्स), दस्तऐवजीकरण (डॉक्युमेंटेशन), त्याचे विविध मार्ग : उदा. कोष्टके, (टेबल्स) तक्ते, नकाशे, इत्यादी; ते देण्याच्या पद्धती; ग्रंथालयांचा उपयोग वा वापर करण्याची आयुधे, उदा. साधनिका (बिब्लिऑग्रॅफी), सूची (इंडेक्स) : यांचे प्रकार, त्यांची

सिद्धता कशी करावी, वापर कसा करावा इ.–ग्रंथवर्गीकरणाच्या विविध पद्धती,–विषय कसा निवडावा, इ. इ.

२) शोधप्रक्रियेशी संबद्ध असणाऱ्या विविध अभिक्रिया (ॲक्टिव्हिटीज): उदा. टिप्पणी करणे; त्यांचे विविध प्रकार व उपयोजन,–शोधप्रकल्पाची रूपरेषा तयार करणे,–सामग्रीची जुळवाजुळव, अभियोजन–गोषवारा (सिनॉप्सिस) तयार करणे–संदर्भ त्याचे स्वरूप, प्रकार, उपयोजन–अभ्युपगमः त्याची मांडणी, पुनर्तपासणी – माहितीसंग्रहण व तिचे उपयोजन, इ. इ.

३) विविध विषयांत वापरल्या जात असणाऱ्या शोधपद्धतींचे वैचारिक अधिष्ठान असणाऱ्या काही मूलभूत गोष्टी :

उदा. वैज्ञानिक पद्धती (सायंटिफिक मेथड), तिचे विविध ज्ञानक्षेत्रीय अवलंबन; – संख्याशास्त्रीय पद्धती (स्टॅटिस्टिकल मेथड), तिचे स्वरूप व वैशिष्टये; – निगमन (डिडक्टिव्ह मेथड), विगमन (इंडक्टिव्ह मेथड), सर्वेक्षण पद्धती (सर्वे मेथड); प्रयोगशालेय पद्धती इ. इ.–याशिवाय माणसाची विचारक्रिया कशी चालते, त्यादृष्टीने सतर्क चिंतन (लॉजिकल थिंकिंग , सर्जक चिंतन (क्रिएटिव्ह थिंकिंग), सबीज वा हेतूपूर्ण चिंतन (ऑर्गॅनिक थिंकिंग) यांचे स्वरूप व संशोधनात त्यांचे स्थान;–संशोधनातील मूलभूतता, अलौकिकता (ऑरिजिनॅलिटी), इ. इ.–या शिवाय विषयप्रतिपादनाच्या निरानिराळ्या पद्धती व त्यांची वैशिष्टये, उदा. ऐतिहासिक आढावा पद्धती, तुलनात्मक पद्धती विश्लेषणात्मक पद्धती, पाहणी व उपायशोधक पद्धती; –कार्यकारणसंबंधदर्शन इ.इ.

४) संशोधनाचे विविध प्रकार व विविध स्तरांवरील संशोधन : उदा०: उच्च वा मूलगामी संशोधन, कार्यावलंबी संशोधन, बाजार व हेतुमूलक संशोधन (मार्केट व मोटिव्हेटेड रिसर्च); ऐतिहासिक, व वस्तुस्थितिशोधक संशोधन (फॅक्ट फाइंडिंग रिसर्च); उपलब्ध तथ्यांचे नवसंबंध दाखविणारे संशोधन; नवार्थदर्शक (इंटरप्रिटेटिव्ह) संशोधन; नवी तथ्ये उजेडात आणणारे संशोधन; –स्वाध्याय,–आधार पुरावे इ. देण्याच्या पद्धती इ. इ.

५) आधुनिक विविध शोधायुधे आणि त्यांचा वापर, उदा. : मुलाखत, प्रश्नमालिका, प्रयोग व त्यांची आखणी,– आधारभूत साधनसामग्री जमविण्याचे विविध मार्ग —पाहणीपद्धती, केस स्टडी (प्रकरणाभ्यास) इ. इ.

६) शोध–अहवाल : प्रकार, स्वरूपः उदा. रिसर्च रिपोर्ट, (शोधकार्य-अहवाल) डिझर्टेशन (उपप्रबंध), थेसिस (प्रबंध), ट्रिटाईज (महाप्रबंध) इ.च्या शोधलेखनाची लेखनवैशिष्टये, भाषा, वाचनीयतेची सूत्रे, – टाईपिंग मुद्रण,–

संकेत व नियम;–शोध अहवालाचे परीक्षण–मूल्यमापन,–अहवालाचे प्रथमपृष्ठ, मध्यभाग, प्रस्तावना, निष्कर्ष, यांचे विशेष. इ. इ.

७) काही अत्यावश्यक संदर्भ व इतर माहिती : उदा. विविध संक्षिप्त रूपे (ॲब्रिव्हिएशन्स), मुद्रित–शोधन–चिन्हे, मौखिक : तिचे महत्त्व व तयारी; शब्दकोश, ज्ञानकोश इ. चा वापर कसा करावा; शुद्धलेखन; अंकलेखन–विशेष, अक्षरक्रम,– शोधकाची गुणसंपदा, त्याचे प्रशिक्षण, स्वशिक्षण, कार्य-वैशिष्टय,– लेखनहक्कांचे (कॉपीराईटस्) स्वरूप. इ. इ.

व्याप्ती– यावरून कल्पना येईल की, संशोधक, शोधक्षेत्रीय अध्येता, ग्रंथकार, कोणीही विद्यापीठीय विद्यार्थी, सर्वसामान्य अभ्यासक इ. यांना उपयुक्त होईल असा हा संदर्भग्रंथ असेल. एखाद्या परिसंवादात, चर्चापाठात, भाग घेणे, व्यापार उद्योग, व्यवहार, समाज इ. शी संबद्ध अशा कोणत्याही गोष्टीची पाहणी करणे, तीत शास्त्रशुद्धता आणणे, एखाद्या विषयावर अभ्यासपूर्ण असा निबंध लिहिणे, एखाद्या ग्रंथाचे अभ्यासपूर्ण (स्कॉलरली) परीक्षण करणे, ही सारी आधुनिक दृष्टीने संशोधनरूप कामे आहेत, त्यांत रस घेणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याला, शिक्षकाला उपयुक्त होईल, मार्गदर्शन मिळेल असा हा ग्रंथ व्हावा अशी अपेक्षा आहे.

साधारणतः विद्यापीठाच्या मानव्यक्षेत्रीय व तत्संबद्ध अशा ज्या विद्याशाखा आहेत. त्या सर्वांच्या विशिष्ट सर्वसमान अशा शोधविषयक व संदर्भविषयक गरजा, मधून मधून थोडे आवश्यक असणारे मार्गदर्शन इ. लक्षात घेऊन या कोशग्रंथाची रचना करण्याचे ठरविले आहे. तथापि हा एक सर्वसाधारण असा मूलभूत (बेसिक), शोधविद्याविषयक व संदर्भविषयक सर्वसामान्य गरजा भागविणारा संदर्भग्रंथ असेल.

म्हणजे ज्याठिकाणी अधिक विषयविशिष्ट सखोल व तज्ज्ञतापूर्ण मार्गदर्शन हवे असेल, असे विषय ह्या कोशाच्या कक्षेपलिकडचे आहेत. त्यासाठी स्वतंत्र ग्रंथ आहेत. त्यांचे महत्त्व वा उपयुक्तता विवादातीत आहे. संशोधन-विषयक अनेक गरजा विषयनिरक्षेप असतात. त्या भागविण्याचा व विशेषतः शोधक्षेत्रीय अभ्यासकाला उपयुक्त व्हावा असा हा नम्र उपक्रम आहे. विशिष्ट विषयाच्या संशोधनाला वाहिलेले जे ग्रंथ आहेत ते समजण्याची अधिक पात्रता ह्या ग्रंथाच्या अभ्यासाने अध्यायीच्या ठिकाणी निर्माण होईल असे वाटते.

नोंदींचे स्वरूप व विशेष – या कोशग्रंथात यावयाच्या विषयासंबंधी येवढे विवेचन केल्यानंतर या उपक्रमाच्या विद्वत्क्षेत्रीय (ॲकॅडेमिक) महत्त्वाविषयी थोडे स्पष्टीकरण अवश्य आहे.

ह्या कोशातील लेख वा नोंदींद्वारा जे विवेचन येईल ते सर्वसामान्य विवेचनाच्या स्वरूपाचे, माहितीपूर्ण, मार्गदर्शक दृष्टीने आलेले आणि उच्चाभ्यास-क्षेत्राशी मिळते जुळते असे असेल. त्यादृष्टीने त्याला स्वतःचे असे विद्वत्वैशिष्टय (ॲकॅडेमिक इंपॉर्टन्स) राहाणार आहे.

तसेच हा कोशग्रंथ असला तरी त्याचे स्वरूप शब्दकोशासारखे (डिक्शनरी) केवळ शब्दार्थलक्षी नसणार. लेखांसाठी ज्ञानकोशीय लेखादर्श पुढे ठेविला आहे. मराठीत अशा ग्रंथाचा हा पहिलाच उपक्रम होय.

वैशिष्टयपूर्ण प्रस्तावना – विद्वत्वैशिष्टयाच्या दृष्टीने महत्त्वाचा असा आणखी एक उपक्रम या कोशाच्या निमित्ताने करण्याचे ठरविले आहे, तिकडे लक्ष वेधितो. ज्ञानाचा प्रसार हा आज अतिशय वेगाने होत आहे. आपल्या ज्ञानक्षेत्रात काय काय चालू आहे, कोणते उपक्रम होत आहेत, कोणत्या दृष्टीने, दिशेने ते विकसित होत आहे, याची सर्वसामान्य अभ्यासकाला कल्पना येणे कठीण झाले आहे. सर्वक्षेत्रीय ज्ञानविकासामुळे ज्ञान हे आत्मजागृत (सेल्फकॉन्शस) झालेले आहे. ज्ञानाची उपासना करणे, व्यासंग करणे, त्यात भर घालणे व त्यापासून लाभ उठविणे, या गोष्टी अतिशय अवघड व तज्ज्ञतेच्या कक्षेत मोडतील अशा झाल्या आहेत. त्यासाठी प्रत्येक क्षेत्राची स्वतंत्र अशी जणु एक तंत्रविद्या निर्माण होत आहे. तिला डिसिप्लीन किंवा अनुशासन अशी पारिभाषिक संज्ञा प्राप्त झाली आहे. ज्ञानक्षेत्राचे विकसन कसे होत आहे, झालेले आहे, त्यात आपले स्थान कोणते याबद्दल शोधकाला, अध्येत्याला थोडेफार मार्गदर्शन असणे अवश्य झाले आहे.

त्या दृष्टीने ह्या कोशग्रंथाला 'शोधविज्ञान : उद्‌गम व विकास' अशा-प्रकारची एक विस्तृत विवेचक अशी प्रस्तावना जोडली जाणार आहे. ते या उपक्रमाचे महत्त्वाचे आधिवैद्यिक (ॲकॅडेमिक) वैशिष्टय ठरेल. ज्ञान कसे मिळविले गेले, जाते, मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर ज्ञानसंग्रहाचा व ज्ञान-ग्रहणपद्धतींचा विकास कसा झाला आहे, विशिष्ट क्षेत्रातील ज्ञानाचे व संशोधनाचे स्वरूप कसे प्रकृतिभिन्न आहे, आंतरअनुशासनाधिष्ठिततेला (इंटरडिसिप्लिनरी रिलेशनशिप) आज का महत्त्व आलेले आहे, इ. विषयांची चर्चा या प्रस्तावनेत अनुस्युत आहे. शोधविद्या ही प्राचीन खरी पण आज तिला शोधविज्ञानाचे स्वरूप कसे प्राप्त झाले आहे इ. विषयांचे विवेचन या प्रस्तावनेत करण्याचे योजिले आहे. प्रस्तावनेच्या उत्तरार्धात मराठीतील संदर्भवाङ्‌मयाचा एक आढावा घेण्याचे मनात आहे. हे सारे मराठीत झालेले नाही पण विद्वत्ता संवर्धनाच्या व विकासाच्या दृष्टीने ते होणे अवश्य आहे असे लेखकाला वाटते, म्हणून हा उपक्रम.

भाषेसंबंधी – या कोशाची भाषा मराठी आहे. पण उच्चस्तरीय अध्येत्यांसाठी (स्कॉलर्ससाठी) हा उपक्रम असल्याने इंग्रजी संज्ञा संकल्पना इ. चा वापर सर्वत्र त्यांच्या मराठी पर्यायांसह व आवश्यक तेथे स्पष्टीकरणासह केला जाणार आहे. या ग्रंथाचे वाचक प्रायः इंग्रजी संकल्पना, संज्ञा यांचा वापर करणारे, संस्कार झालेले असणार. केवळ मराठी पर्याय वापरला तर त्यांना अडखळल्यासारखे होईल म्हणून ताबडतोबच कित्येक स्थळी इंग्रजी पर्याय कंसात देण्याचे धोरण ठेवण्याचे मनात आहे. अनेक नवे शब्द वा रूढ शब्दांना नवे पर्याय लागणार आहेत. ते प्रारंभी अपरिचित वाटतील, पण लवकर त्यांचा सराव होईल. एक गोष्ट स्पष्ट करतो, हा विषय आपल्याकडे चिंतनालाच नवा आहे. त्याची परिभाषा अद्याप ठरावयाची आहे. त्यामुळे काही अडचणी येणे अपरिहार्य आहे. पण सारे विवेचन सुगम करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ह्या ग्रंथाचा वाचक हा प्रायः पदव्युत्तर वर्गातील प्रगल्भ विद्यार्थी वा पदव्युत्तर परीक्षा झालेला असा असणार आहे. त्याला हे विवेचन सहज समजेल, असे वाटते. ग्रंथाच्या शेवटी शोधविषयक वैशिष्ट्यपूर्ण संज्ञासंकल्पनांचे मराठी पर्याय देण्याचे ठरविले आहे. शोध ही विशिष्ट क्षेत्रीय वा भाषिक अशी अभिक्रिया (अॅक्टिव्हिटी) न मानता ती सर्वंकष सर्वगामी अशी वृत्ती आहे, ह्या गोष्टीचा विसर न पडू देता या कोशाची रचना केली जात आहे.

लेख वा नोंदी (एंट्रीज) कशा प्रकारच्या असतील ह्याची कल्पना येण्यासाठी काही नमुना–नोंदी या ठिकाणी उद्धृत करीत आहे. विषयाप्रमाणे नोंदीचे स्वरूप बदलते राहणे स्वाभाविक आहे. काही नोंदी माहितीपर आहेत, काही विवेचनपर, काही मार्गदर्शनपर, काही विशुद्ध तत्त्वचर्चापर, तर काही विशिष्ट स्वरूपात उपयुक्त व तांत्रिक अशा आहेत. वर उल्लेखिलेल्या विषयांवरून त्यांची कल्पना येईल.

असा हा एक मला नावीन्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण व उपयुक्त वाटणारा उपक्रम हाती घेतला आहे. मराठीत ह्या स्वरूपाचे म्हणजे विद्वत्ता म्हणजे काय व तत्संबद्ध विविध विषयांची चर्चा करणारे लेखन अपवादभूत असे झालेले आहे. एवढ्या विस्तृतपणे तर हे प्रथमच होत आहे. तरी ह्या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन संबंधितांनी, आस्था बाळगणारांनी उपयुक्त सूचना केल्यास, अभिप्राय कळविल्यास, निदान साधी पोच दिल्यास मी त्यांचा अत्यंत आभारी होईन. त्यायोगे लवकर काम पूर्ण करण्यास हुरूपही येईल.

संकेत
९३ शिवाजी पार्क
कोल्हापूर ४१६००१

– दु. का. संत

नोंदींचे नमुने

नोंदीत ज्या शब्दापुढे √ ही खूण मजकुरात आली आहे त्या विषयावर ग्रंथात स्वतंत्र नोंद आहे, असे समजावे.

८ शोधविज्ञान कोश

[नोंदी : २५० ते ३००; आकार : डेमी १/८
पृष्ठसंख्या : एकूण ४५० ते ५००]

◊ **अकार विल्हे** :– अर्थ : वर्णमालेच्या अकारादि अनुक्रमाप्रमाणे व्यवस्थापन ऊर्फ विल्हेवाट; आनुपूर्वी; वर्णानुक्रमानुसारी; आल्फाबेटिकली.

कोशातून संदर्भ शोधताना तसेच शोधलेखनाच्या वेळी ग्रंथकार, सूचिग्रंथ इत्यादींची यादी तयार करताना अकारादि क्रम महत्त्वाचा. आपल्या वर्णमालेचा व तिचे लेखन करण्यासाठी तयार झालेल्या बाराखडीचा प्रारंभ 'अ' ने होतो. ओंकाराच्या प्रारंभी अ च असतो (अ + उ + म = ॐ). जगातील महत्त्वाच्या वर्णमाला किंवा बाराखड्यांचा प्रारंभ 'अ' नेच होतो. पाणिनीसुद्धा अ हाच पहिला वर्ण मानतो.

मराठी–संस्कृतादि भारतीय भाषांत विशिष्ट उच्चार व तो उच्चार ज्या अक्षराने म्हणजे लेखनचिन्हाने दर्शविला जातो त्या चिन्हाचे (अक्षराचे) नाव ह्या दोन्ही एकच आहेत. इतर भाषांत तसे नाही. इंग्रजीत 'अ' हा उच्चार लेखनबद्ध करताना 'ए', 'ई', 'यू' इ. स्वरात्मक चिन्हे वापरावी लागतात. फारशीत 'अ' उच्चाराच्या अक्षराचे नाव 'अलिफ' आहे. ग्रीक भाषेत 'आल्फा' ही संज्ञा त्यासाठी आहे. त्या वर्णमालेचे दुसरे अक्षर 'बीटा' आहे. ह्या पहिल्या दोन अक्षरांवरून आल्फाबेट (म्हणजे वर्णमाला) असा शब्द रूढ झालेला आहे.–

मराठीची वर्णमाला संस्कृतवरून आली आहे. तथापि तिच्यात संस्कृतमधील दीर्घ ऋ (ॠ) व दीर्घ ऌ (ॡ) हे स्वर नाहीत.

मराठी वर्णमालेच्या अनुक्रमात मतभेद आहेत. 'अ' हा प्रारंभीचा वर्ण असल्याने 'अ' हे प्रथमाक्षर आहे. परंतु 'भारतीय संस्कृतिकोशा'त 'अं' हा पहिला मानून 'अं' हे मंत्रशास्त्रात पहिले बीज मानले आहे, असे त्याचे कारण दिले आहे. 'संस्कृतिकोशाच्या' भूमिकेला ते साजेसे असले तरी 'अ' ने वर्णमालेचा प्रारंभ होणे हा प्रघात आहे. आणि इतर अनेक शब्दकोशांनी व ज्ञानकोशांनी तो मानला आहे. य. रा. दाते संपादित 'महाराष्ट्र शब्दकोशा'त तसेच 'मराठी विश्वकोशा'त 'अ' या अक्षरानेच वर्णमालेचा प्रारंभ होतो, असे मानले आहे. हिंदीत पण 'अ' पहिला येतो.

अ आ इ ई...हा स्वरांचा क्रम सर्वांच्या परिचयाचा असतो. व बहुतेक शब्दकोश त्याचाच अवलंब करतात. मराठी विश्वकोशाने तोच क्रम निश्चित केला आहे. या क्रमाप्रमाणे अनुस्वाराचा क्रम (अच्या बाबतीत अं) औच्या नंतर लागतो. तो वस्तुतः 'अ' नंतर घेणे शब्दकोश पाहण्याच्या दृष्टीने व तत्त्वतःही सोयीचे होईल. कारण या व्यवस्थेत फक्त 'अं' शेवटी येतो. इतर स्वरांवर (इ, उ, ए, इ. वर) जेव्हा अनुस्वार येतो तेव्हा तो स्वतंत्रपणे दाखविला

जात नाही 'इ' नंतर 'इं' येतो तोच नियम अ ला लागू करावयास हरकत नाही. (तीच गोष्ट विसर्गाबाबतही.) काही कोशकारांनी तसे केले आहे. म्हणजे या दृष्टीने स्वरांचा क्रम असा होतो:–

अ, अं, अॅ, अः, आ, ऑ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ,

इंग्रजीच्या संपर्काने अॅ व ऑ हे नवे उच्चार आले आहेत. ते दर्शविताना त्या त्या अक्षरावर अर्धचंद्राकृती काढणे रूढ आहे. अनेक इंग्रजी शब्द मराठीत रूढ झाले आहेत. त्यासाठी हे दोन उच्चार वर्णमालेत समाविष्ट करणे योग्य होईल.

दुसरा वादाचा प्रश्न 'क्ष' व 'ज्ञ' या जोडाक्षरांचा. वास्तविक ती जोडाक्षरे आहेत. वर्णमालेत त्यांना स्थान असण्याचे कारण नाही. पण दीर्घ परंपरेने वर्णमालेशी ती बद्ध झाली आहेत. संस्कृत वर्णमालेत ती शेवटी येतात. तशीच प्रथा मराठीत आहे. हिंदीत क्ष = क्ष असे मानले जाते व तेथे क नंतर त्याचा क्रम लागतो. ज्ञ (द् + न् + य्) बाबतीतही असेच म्हणता येते. परंपरेने आलेली प्रथा म्हणजे 'क्ष' व 'ज्ञ' ही शेवटची अक्षरे मानणे योग्य. कारण ज्ञच्या बाबतीत 'द् + न्' असे मानायचे का 'ज् + न्' असे मानावयाचे असा प्रश्न निर्माण होईल. प्रत्यक्षात 'ज्ञ' हा उच्चार वरील दोन्ही पर्यायांपेक्षा थोडा भिन्न आहे. तो स्वतंत्रपणेच लिहिला जाणे व त्याचा क्रम वर्णमालेच्या शेवटी असणे योग्य.

व्यंजनांच्या बाबतीत मात्र रूढ असलेले नियम जवळजवळ सर्वमान्य आहेत. त्या दृष्टीने त्या अक्षरांचा क्रम असा :–

क, ख, ग, घ, ङ; च, छ, ज, झ, ञ; ट, ठ, ड, ढ, ण; त, थ, द, ध, न; प, फ, ब, भ, म; य, र, ल, व; श, ष, स; ह, ळ, क्ष, ज्ञ.

यांतील 'क्ष' व 'ज्ञ' चा उल्लेख वर आलेलाच आहे. ङ् ञ् ण् न् म् ह्या अनुनासिकांचे लेखन संस्कृतमध्ये त्यांचा उच्चार पूर्ण होत नाही त्याठिकाणी त्यांचे अर्धलेखन होते (ती अक्षरे अर्धी लिहिली जातात.) मराठीत ह्या ठिकाणी त्या अक्षरावर टिंब देण्याची प्रथा आहे. त्याला अनुस्वार √ असे म्हणतात. प्रत्येक ठिकाणी वेगळे अनुनासिक √ लिहिण्यापेक्षा टिंब देणे चांगले व सोयीचे.

अशा रीतीने वर्णमालेचा क्रम समजून घेऊन त्याप्रमाणे शब्दकोश, सूची इत्यादींचे वाचन करावे व जेव्हा सूची इत्यादी करावयाची वेळ येईल तेव्हा उपयोगात आणलेला क्रम स्पष्ट करावा. त्याप्रमाणे अनुसरावे.

पाहा : शुद्धलेखन, जोडाक्षरांचे लेखन, अनुक्रम : अंतर्गत, अनुस्वार लेखन-संकेत, रोमन अंकांचे लेखन.

◊ **टिप्पणी किंवा नोट्स काढणे** – शोधलेखनात विषय एकदा निश्चित झाल्यानंतर व विषयाशी संबद्ध अशी पुस्तके वाचल्यानंतर पुढचा महत्त्वाचा भाग म्हणजे नोट्स किंवा टिप्पणी काढणे हा होय. ह्याइतके महत्त्वाचे शोधलेखनात इतर काही नाही. वाचन जेव्हा नोट्सच्या रूपाने आपल्याजवळ ग्रथित होते तेव्हा ते खरे साधन होते. त्यावरच लेखनाची मदार असते. विशेषतः शोधलेखनात आधार, पुरावे, अवतरणे इत्यादींना अपरंपार महत्त्व असते. शोधयोजनेचा निम्मा अधिक काळ वाचन व नोट्स काढणे यांच्या कारणी लावणे उचित.

विशेष म्हणजे या नोट्सवर कोणाचीही तपासणी (सुपरविजन) नसते. अध्येत्याने त्या स्वतःसाठी व स्वतःच काढावयाच्या असतात. या नोट्सवर शोधलेखनाची यशस्विता अवलंबून असते. अगोदर जरी थोडे चुकल्यासारखे वाटले तरी अल्पकाळात नोट्स काढण्याचा चांगला सराव होतो. स्थूलमानाने मार्गदर्शन केले जात असले तरी प्रत्येकाने याबाबतची स्वतःचीच पद्धती ठरविणे इष्ट.

टिप्पणी काढणे ही एक कला आहे. त्यासाठी कोणतीही प्रमाणभूत (स्टँडर्ड) पद्धती निर्माण झालेली नाही. आपल्या गरजेप्रमाणे विषयाच्या वैशिष्ट्याप्रमाणे आपण आपली नोट्सची पद्धती ठरवणे अवश्य असते.

नोट ही फार विस्तृत नसावी पण आपली गरज भागेल एवढी माहिती तीत असावी. त्याचप्रमाणे ती फार संक्षिप्तही नसावी, नाहीतर आयत्यावेळी ती उपयोगी पडत नाही. परंतु संक्षिप्त नोट असण्यापेक्षा विस्तृत असणे चांगले. फार मोठी टिप्पणी असेल तर तिच्यातला काही भाग गाळता येतो. पण फार लहान असेल तर काहीच करता येत नाही. ती असून नसल्यासारखी होते. म्हणूनच आपल्याला पाहिजे तेवढ्या व तशा नोट्स काढणे आत्मसात करावे.

टिप्पणी काढण्याच्या वेळी त्या आपणांस पुढे वारंवार पाहाव्या लागणार आहेत या दृष्टीने कागदाची निवड करावी. कारण, त्या पुढे वारंवार हाताळाव्या लागणारच, पण नेहमी मागेपुढे, खालीवर कराव्या लागणार असतात. म्हणजे ज्या क्रमाने त्या काढलेल्या असतात त्याप्रमाणे त्या वापरल्या जाणे कधीच शक्य नसते. ज्या कागदावर आपण टिप्पणी काढणार आहोत तो कागद वाटेल तेथे पडणारा तुकडा नसावा. त्याचप्रमाणे त्यावर काही चिडबिडलेले नसावे. त्या दृष्टीने निरनिराळे अभ्यासक निरनिराळ्या सूचना करतात. याबाबतच्या पुस्तकांत उल्लेखिला प्रमुख मार्ग म्हणजे नोट्ससाठी विशिष्ट आकाराची कार्डे किंवा जाड कागद वापरावा. या कागदांसाठी ३''×५'', ४''×६'', ५''×८'' किंवा ५½''×८'' असे विविध आकार सुचविले जातात. जाड कागद किंवा कार्ड

सुचविण्याचे कारण म्हणजे प्रत्यक्ष हे कागद नेहमी पिसल्याप्रमाणे मागेपुढे करावे लागतात. जाड कागद त्या हाताळण्यात टिकू शकेल. व लहान आकाराचे कागद घेतल्याने ते हाताळणेही सोपे जाईल. कागदाचा आकार निवडताना तो सामान्यतः महत्त्वाचा मजकूर मावण्याइतका मोठा असावा, व हाताळण्यात सोयीचा पडावा इतका लहान असावा. कित्येकजण साध्या फुलस्केप आकाराचा एकचतुर्थांश कागद पुरस्कारतात. वरील ५½" × ८" हा तोच आकार आहे.

प्रत्येक विषयाला स्वतंत्र कागद वापरावा. तसेच एक बाजू मजकुराने संपल्यावर मागची बाजू वापरावी. एका कागदात जर एकादे टिप्पण मावले नाही तर दुसरा कागद वापरावा. त्याच्या प्रारंभीचा (वरचा) थोडा भाग विषयाचे नाव इ. लिहिण्यासाठी मोकळा ठेवावा. विषयाचे सर्व कागद एकत्र जमवावे व पिनने ते एकत्र करावे. म्हणजे सर्व टिप्पणी तयार झाल्यानंतर त्यांचा विषयवार अनुक्रम लावता येईल.

जो आकार ठरवू तो आकार त्या सर्व शोधकार्यासाठी कायम ठेवावा. विशिष्ट शोधप्रकल्प संपला तरी नोट्सचे महत्त्व कमी होत नाही. त्या अखंड महत्त्वाच्या असतात. पुढेमागे केव्हाही त्या तशा उपयोगी पडतात. पूर्वी सुटे कागद वापरण्याऐवजी पुष्कळजण एक्सरसाइज (बांधलेली) पुस्तके वापरीत असत. त्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर झालेला आहे असे दिसून येईल. त्याचप्रमाणे विशिष्ट कामासाठी वेगळे कागद वापरणे कित्येकदा अवश्य असते. त्यावेळी निरनिराळ्या रंगांचे कागद वापरावे. विशिष्ट वा आपण ठरवू त्या आकाराचे कागद किंवा कार्डे आगोदर व्यवस्थित कापून आणणे योग्य होईल.

नोट्सच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे. प्रत्येक पुस्तकाचे प्रथम स्वतंत्र असे एक साधनपरिचायक (बिब्लिऑग्रॅफिक) कार्ड तयार करावे. त्यात लेखकाचे पूर्ण नाव, नंतर पुस्तकाचे नाव, प्रकाशन, तारीख इ. मूलस्रोत (सोर्स) यादृष्टीने आवश्यक असणाऱ्या गोष्टी स्पष्ट केलेल्या असाव्यात, यात बिनचूकपणाकडे अधिक लक्ष द्यावे. लेखनकाम संपण्याच्यावेळी या कार्डांवरूनच आपली स्वतःची साधनिका √ तयार करावयाची असते. त्याशिवाय सर्व माहिती एकत्र राहते हा भाग वेगळा.

प्रत्येक कार्डावर त्याचा विषय स्पष्ट पण थोडक्यात लिहिलेला असावा. याबाबतीतला एकदा सराव झाला की, हा संदर्भ कशारीतीने लिहावयाचा हे आपोआप समजते.

टिप्पणी काढताना जेव्हा पुस्तकाचे एक पान संपते व दुसरे पान सुरू होते

त्यावेळी त्या दोन पानांमधील मजकुरामध्ये (पहिल्याच्या शेवटी व दुसऱ्याच्या प्रारंभी) V ही खूण ठसठशितपणे लिहून तिच्या एका टोकाला पहिले पृष्ठ व दुसऱ्या टोकाला दुसरे ७५ V ७६ असे लिहावे. म्हणजे पुढे संदर्भ देताना पृष्ठाचा उल्लेख बिनचूक करणे सोयीचे होईल.

नोटस् काढताना विशिष्ट संकेत वापरावयास हरकत नाही. पुस्तकाची नावे उदा. भा. सा. (भारतीय साहित्यशास्त्र) अशाप्रकारे लिहावयास हरकत नाही. एखादे नाव व एखादी संज्ञा वारंवार येत असेल तर प्रारंभी ती स्पष्टपणे लिहून नंतर तिचे संक्षिप्त रूप वापरावयास हरकत नाही. उदा अर्थ० = अर्थशास्त्र, मानस० = मानसशास्त्र. Literature = Lit, Psychology = Psy. त्याप्रमाणे आणखीही काही विशिष्ट वा प्रसिद्ध संक्षिप्त रूपे टिप्पणीत वापरावयास हरकत नाहीत.

पाहा : टीकाटिप्पणी, नोटस्चे प्रकार: उपयोजनतंत्र, टिप्पणांचे नमुने.

◊ **शोध अहवाल वाचक संज्ञा**– रिसर्च रिपोर्ट या शब्दाचे मराठीकरण म्हणजे शोधअहवाल. पण तो एकस्वरूपी नाही. निरनिराळ्या कारणांनी त्याचे आणखी डिझर्टेशन, थेसिस, असे पर्याय पडतात. शोधअहवाल हा शब्द तसा या सर्वांना लागू होईल असा आहे.

डिझर्टेशन व थेसिस त्या संज्ञांबाबत : आपल्याकडे एम् ए, अगर तत्सम परीक्षांसाठी सादर करावयाच्या प्रबंधांना 'डिझर्टेशन' √ ऊर्फ उपप्रबंध असे म्हटले जाते. (महत्त्वाच्या प्रत्येक परीक्षेला असा एक उपप्रबंध असावा इकडे अनेक तज्ज्ञांचा कल आहे.) पीएच्. डी. साठी लिहिल्या जाणाऱ्या प्रबंधांना 'थेसिस' √ ऊर्फ प्रबंध म्हटले जाते. व हा आकाराने मोठा, विषय अधिक महत्त्वाचा, व्यापक, सखोल चिंतनाला अवसर देणारा असा असावा अशी अपेक्षा असते. अमेरिकेत ह्या संकल्पना नेमक्या उलट अर्थाने रूढ आहेत. म्हणजे पीएच्. डी.– डिझर्टेशन व एम. ए.– थेसिस, असे तिकडे म्हटले जाते. हा संकेतांचा भाग झाला. ह्या दोन्ही शब्दांचे अर्थ समान आहेत. ते एकमेकांचे पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. पण सोयीसाठी रूढ झालेले डिझर्टेशन, (उपप्रबंध), थेसिस (प्रबंध), √ ट्रिटाईज (महाप्रबंध) अशी √ चढती श्रेणी मानून त्यांच्यासाठी एम्. ए. पातळीवरील परीक्षा, पीएच डी. व डी. लिट्. सारख्या पदव्या ठेवणे इष्ट होईल.

काही विद्यापीठांत पदवीपातळीवरील परीक्षांना शोधलेखन आवश्यक असते. त्यासाठी 'रिसर्च रिपोर्ट' 'टर्म पेपर' हेच पर्याय वापरले जातात. हे तयार करण्याचा अवधी ४–६ महिने एवढाच असतो. पदव्युत्तर पदवीसाठीचे

शोधलेखन जास्त मुदतीचे (१ वर्षापेक्षा जास्त) व सखोल असते. ते झाल्यानंतर सादर करावयाच्या लेखनास प्रबंध म्हणतात. इंग्रजीत थेसिस व डिझर्टेशन हे शब्द समानार्थी आहेत. पण त्यात सोयीसाठी वरीलप्रमाणे व्यवस्था करता येईल.

पाहा : प्रबंध (थेसिस), डिझर्टेशन, ट्रिटाईज (महाप्रबंध), संज्ञा व संकल्पना.

◇ **शोध अहवालाची भाषा**– शोध-अहवालाची भाषा हा एक स्वतंत्र लक्ष देण्यासारखा विषय आहे. चांगला शोध-अहवाल हा भाषेच्या दृष्टीनेही लक्षणीय असतो. लेखनातले कौशल्य सहजासहजी येत नाही. अभ्यास, निरनिराळया तांत्रिक बाबीचे अवलंबन, व पुष्कळ सराव यांनी लेखनसुलभता साध्य होते. कोणत्याही अन्य गोष्टीचेही तसेच आहे. विषयाची चांगली जाण व तर्कशुद्ध विचार करण्याची पद्धती यांनी पुष्कळ साध्य होते. पण चांगल्या लेखनकौशल्यासाठी हे पुरेसे नाही. या विषयावर अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांतून शब्दांची निवड, वाक्याची धाटणी व अर्थाचे बारकावे यासंबंधी पुष्कळ मार्गदर्शन असते. ती वा त्यांपैकी काही अवश्यपणे वाचावीत. पण काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या. सामान्य असल्या तरी त्यांचे अवलंबन उपयुक्त ठरेल.

व्याकरणशुद्धता ही पहिली गोष्ट. व्याकरणाच्या साध्या व मूलभूत महत्त्वाच्या नियमांचे प्रतिपालन करावे. त्यायोगे स्पष्टपणा येतो. व्याकरणविषयक नियमांचे अज्ञान वा त्यांकडे होणारे दुर्लक्ष ह्यामुळे संशोधनाविषयी वाचकाचे मत अत्यंत प्रतिकूल होते. साधे व्याकरणाचे नियम या अभ्यासकाला जमत नाहीत तर संशोधन काय जमणार? असा त्याच्यापुढे प्रश्न निर्माण होतो. याशिवाय व्याकरणशुद्धतेला एक प्रकारचे सांस्कृतिक महत्त्व आहे हे लक्षात ठेवावे. मराठीत तर हा विषय फार महत्त्वाचा आहे. निरनिराळ्या शब्दांचे लेखन बिनचूक असावे. ल, ळ; न, ण; ष्ट, ष्ठ; त्य, त्त; इ. त्याचप्रमाणे ऱ्हस्व दीर्घ, यांच्या लेखनाच्या चुका होऊ देऊ नयेत. नवे नवे लेखन वा अभिव्यक्तिविषयक प्रयोग करण्यास संशोधनअहवालात अवसर नसतो. मराठीत अनुस्वारांचे √ लेखनही काटेकोरपणे व्हावे.

वाक्यरचना करताना कर्तरी कर्मणी प्रयोगांचा बिनचूक वापर करावा, लहान व मूर्त शब्दांना अधिक स्थान द्यावे. सामासिक व दीर्घ शब्दांनी कदाचित अर्थात नेमकेपणा येईल. परंतु साधे शब्द सुगमपणा वाढवितात. लहान लहान वाक्ये, भाववाचक नामे, कर्ता, कर्म, क्रियापद यांचा बिनचूक वापर महत्त्वाचा आहे. कित्येकांना विशेषणे बहुलत्वाने वापरण्याची सवय असते. पण शोधनिबंधात त्यांना महत्त्वाचे स्थान नाही. त्याचप्रमाणे वाक्याची रचना कित्येकदा संदिग्ध स्वरूपाची होते. आपणांस अपेक्षित अर्थापेक्षा वेगळाच अर्थ प्रत्यक्षात व्यक्त होत

असतो. प्रत्यक्षत: प्रत्येक परिच्छेद लिहून झाल्यावर त्याची अर्थ व रचना दृष्टीने पुनर्तपासणी करावी. कित्येकांना रोजच्या प्रचारातले व रूढ तांत्रिक शब्द वापरण्याची फार आवड असते. तसे वापरावयास हरकत नाही. परंतु प्रारंभी वा पहिल्या वापराच्या वेळी त्यांचा अर्थ स्पष्ट करावा. उदा. 'सबजेक्ट' हा शब्द मानसशास्त्रात विशेष अर्थाने वापरला जातो. असे प्रत्येक ज्ञानशाखेत काही वैशिष्टयपूर्ण शब्द असतात. त्यांचा वापर केवळ फॅशन म्हणून न करता अधिक अर्थपूर्णतेने करावा.

शोधलेखाच्या वेळी वाचकाची शब्दसंपत्ती लक्षात घ्यावी. कोणत्या प्रकारच्या वाचकांसाठी लेखन आहे ह्याचे भान ठेवावे. तांत्रिक महत्त्वाचे वा नवे शब्द अगोदर स्पष्ट करावे. विविध प्रवृत्तीच्या वाचकांना आकलन सुलभ व्हावे म्हणून तळटीपांचा वापर करावा. त्याचप्रमाणे अमूर्तापेक्षा समूर्त व चित्रशब्द वापरणे अधिक चांगले. योग्य शब्द योग्य ठिकाणी वापरणे, ही सवय फार चांगली. काही शब्द निरनिराळ्या व्यक्तींच्या मनात निरनिराळ्या प्रतिमा निर्माण करतात व त्यामुळे अर्थाची एकवाक्यता राहात नाही. अर्थव्यक्तीसाठी मधून मधून उपमा रूपकांचा समर्पक वापर करावयास हरकत नाही. तसेच अगदी थोड्या प्रमाणात शब्दावर्तन किंवा अनुप्रास समर्थनीय ठरतात.

एकदा एखादे प्रकरण लिहून झाले की, भाषा, अभिव्यक्ती, आशय इत्यादी दृष्टींनी ते पुन: पुन: वाचावे. फापटपसारा कमी करावा, शक्य तितके नेमके व आवश्यक शब्दांत आपले म्हणणे व्यक्त करावे. पुन: पुन: तपासणे व प्रत्येकवेळी बदल करीत राहणे हे अवश्य असते. एकदा लिहिले की ते वज्रलेप, हा नियम शोधलेखनाला लागू नाही. कित्येक लेखक तीन तीन चार चार वेळा सर्व मजकूर लिहून काढतात. यावरून लेखनकौशल्य हे किती कष्टपूर्वक येत असते ह्याची कल्पना येईल.

पाहा : लेखनशैलीचा प्रश्न, विषय प्रतिपादनपद्धती, शोधनिबंध, शोधनिबंधाचा वाचक, शोधलेखनातील मौलिकता.

◊ **शोध विषयाची निवड**– संशोधनासाठी कोणता विषय निवडावा ही महत्त्वाची गोष्ट होय. ज्यावेळी एखादा विद्यार्थी त्या दृष्टीने पाहाणी करावयास लागतो त्यावेळी त्याला असे आढळून येते की, करण्यासारख्या व महत्त्वाच्या, तसेच आपल्या आवडीच्या विषयावर आगोदरच कोणीतरी संशोधन केलेले आहे. प्रत्यही कोणीना कोणी तरी एखाद्या विषयावर संशोधन करीतच असते. त्या दृष्टीने अभ्यासक आपल्या आवडीच्या विषयावरचे जेव्हा प्रबंध शोधू लागतो तेव्हा त्याची प्रतिक्रिया आता पहिल्याप्रमाणे होते.

काही काही विषयांत तशी नवी नवी भर नित्य पडत असते, उदाहरणार्थ इतिहासात नव्या नव्या साधनांची माहितीची भर पडत असते. त्यामुळे साहजिकच नवे विषय तयार होत असतात. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात व स्वातंत्र्य मिळ-ण्याच्यावेळी कोणत्या घटना घडल्या, त्यांची नोंद असणारे दस्तऐवज आज बाहेर आलेले आहेत. त्यामुळे कितीतरी नवे नवे व उत्कृष्ट ग्रंथ त्यावर इंग्रजीत लिहिले गेले आहेत, जात आहेत.

वैज्ञानिक शास्त्रांच्या क्षेत्रात नव्या विषयांची तशी वाण नसते, कारण झालेल्या संशोधनातून एखादा प्रॉब्लेम काढता येतो की, जो नव्या व वेळप्रसंगी मौलिक संशोधनास उदंड अवसर देणारा असतो. सामाजिक शास्त्रांत निर-निराळ्या प्रकारची पाहणी करणे हे इतके रूढ झाले आहे की, त्याचीही एक चाकोरी ठरून गेली आहे. शैक्षणिक बाबतीत पाहू गेले तर अनेक संस्था विविध प्रकारची माहिती वर्षाच्या कामाचा भाग म्हणूनच जमवीत असतात. कित्येक वेळा निर्माण होणारे प्रश्न वरवरची पाहणी करून कोणते तरी निर्णय घेऊन सोडविले जातात. म्हणजे ते प्रश्न संशोधनाच्या पातळीप्रत चढतच नाहीत. वाङ्मयाच्या क्षेत्रातही बहुसंख्यांना जवळचे वाटणारे, ग्रंथकार, कालखंड, वाङ्मयप्रकार इ. आगोदरच कोणीतरी घेतलेले असतात, अशा रीतीने विषयाची निवड हा प्रश्न सर्वत्र जटिल झाला आहे.

कित्येकांची अशी समजूत असते की, गाइडकडे अनेक 'प्रश्न' वा विषय असतात, त्यांच्याकडून एखादा विषय घेतला की काम संपले. सुधारलेल्या देशांत विद्यापीठांचे विभाग तसेच, विविध प्रकारच्या माहितीचे संकलन, पाहणी इत्यादी करणाऱ्या अनेक संस्था संघटना असतात. त्या संशोधनयोग्य विषयांच्या याद्या वेळोवेळी प्रसिद्ध करीत असतात. त्यांतून विषय निवडणे सोपे होते. कित्येक विविध अभ्यासक्षेत्रात एखादा मोठा प्रकल्प हाती घेतलेला असतो, त्या दृष्टीने अनेक विषयांचे संकलन झालेले असते. नव्या अभ्यासकास त्यांपैकी एखादा विषय निवडता येतो, व त्या प्रकारच्या उभारणीतही सहभागी होता येते. तशी अवस्था आपणांकडे अद्याप आलेली नाही. त्यामुळे विषय कोणता निवडायचा हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. अध्येत्यालाच विषय निवडावा लागतो. त्यासाठी अवलोकन चिंतनाची जोड अवश्य आहे. प्रसिद्ध वा विद्यापीठातून तयार झालेल्या प्रबंधांची पाहणी करणे हा एक मार्ग आहे. अशा रीतीने तयार प्रबंधांची यादी थोड्या-प्रयत्नाने उपलब्ध होऊ शकते व विषय निवडण्यात तिचे साहाय्य होऊ शकते.

विषय निवडताना आपल्या आवडी निवडी, प्रवृत्ती, विषयाभ्यास इ. गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. नुसती दिलेल्या विषयावर काम करण्याची तयारी असून चालत नाही; तर त्या विषयामध्ये आपणांस रस असला पाहिजे. त्यासाठी

अभ्यासू व चौकस वृत्ती असावी लागते. अशी प्रवृत्ती असणारा विद्यार्थी पूर्वीपासूनच विषयाच्या शोधात असतो. विषयाची निवड हा शोधक्रियेतील महत्त्वाचा घटक. हा विषय स्वतः शोधलेला असणे अधिक चांगले. त्यासाठी निरनिराळे मूलस्त्रोत (सोर्सेस) उल्लेखिले जातात. प्रत्येक विषयाच्या बाबतीत हे वेगवेगळे असू शकतात. आपल्या अभ्यासक्षेत्राचे पृथक्करण करून कशाची अधिक गरज आहे, हे शोधून काढता येते. उच्च शिक्षणाचा जो अभ्यास-क्रम असतो, त्याच्या निरनिराळ्या अंगांची पाहणी करण्याच्या प्रयत्नातूनही एखादा विषय सापडतो. त्याचप्रमाणे आपल्या अभ्यासक्षेत्रात झालेल्या संशोधनाचे बारकाईने अवलोकन करून त्यातूनही एखादा नवा विषय मिळू शकतो. कित्येकदा तर निरनिराळ्या प्रकाशनांची यादी, विशेषतः त्या विषयास वाहिलेली नियतकालिके चाळत असताना एखादा नवा विषय सुचून जातो. अशा रीतीने ' विषयाचे संशोधन ' थोडे लांबले तरी ते फायद्याचे ठरते.

विषयाच्या निवडीसाठी काही प्राथमिक वाचन √ करणेही कित्येकदा अवश्य ठरते. एखादा विषय दृष्टीसमोर आल्यावर त्या विषयावरले किंवा त्याच्याशी संबद्ध विषयावरचे काही ग्रंथ वाचावे. त्यांनी निवडावयाच्या विषयाची अधिक स्पष्ट कल्पना येते व त्याचबरोबर काही अडचणीही लक्षात येतात. त्या कित्येकवेळा दुर्लंघ्य असतात. सहाजिकपणे तो विषय वगळणे याच अवस्थेत योग्य होईल. अशा रीतीने सुचलेल्या विषयावर किंवा विषयाशी संबद्ध असे प्राथमिक वाचन हे महत्त्वाचे ठरेल, किंबहुना ती एक अवश्य बाबही मानणे योग्य होईल.

कित्येकदा तर झालेल्या या वाचनातून किती चुकीच्या दृष्टीने एखाद्या विषयाची मांडणी झाली आहे हे लक्षात येते, व ती उणीव दूर करण्याच्या हेतूने नव्या दृष्टीतून लेखन-संशोधन होते. अशा रीतीने विषयाची निवड थोड्याफार अभ्यासपूर्वक व काटाकाळजीने होणे अवश्य असते. या बाबतीत चालढकल घाई केल्यास व चुकीचाच विषय निवडल्यास पुढे पश्चाताप करण्याची पाळी येईल. त्यादृष्टीने या विवेचनाचे महत्त्व पटेल.

विषय निवडताना मनाशी काही अडाखे तयार करणे योग्य होईल. आपली निवड योग्य आहे की नाही, हे पाहाण्यासाठी पुढे दिल्याप्रमाणे काही प्रश्न मनात बाळगणे योग्य होईल : १) निवडलेला विषय औत्सुक्य निर्माण करणारा (इंटरेस्टिंग) आहे काय ? २) तो नावीन्यपूर्ण आहे काय ? ३) त्याच्या अभ्यासाने ज्ञानात काही भर पडणार आहे काय ? ४) तो आपणांस झेपण्यासारखा आहे काय ? ५) त्यावर यापूर्वी कोणी काम केले आहे काय ? इ.

हे प्रश्न दिसण्यात साधे पण अत्यंत महत्त्वाचे आहेत. निवडावयाच्या विषयात ' रस ' नसेल तर काम कंटाळवाणे वाटेल. तसेच विषयाचे नावीन्य

आपण पुरे पडताळून पाहावयास हवे. तिसऱ्या प्रश्नामुळे आपणांस या विषयाच्या बाबतीत काय करावयास हवे, कोणती भूमिका घ्यावी त्याचा उलगडा होईल. कित्येकदा एखादा विषय आपणांस फार आवडतो, त्यावेळी हुरळून जाऊन त्याच्यावर कामही करावयास लागतो; पण पुढे विषयाचा एकंदर आवाका आपल्या कक्षेबाहेरचा आहे असे आपल्या ध्यानात येते. तेव्हा या प्रकारचा विचार पूर्वीच झालेला असणे योग्य होय. त्याप्रमाणे त्याविषयावर कोणी कोणी काम केले आहे, त्याची दखल घेऊन आपला विषय निश्चित करणे अत्यंत महत्वाचे आहे.

विषयाची निवड योग्य झाली किंवा नाही हे ठरविण्याच्या काही कसोटद्या विचारात घेणे अवश्य आहे. निवडलेल्या विषयात नावीन्य असले, म्हणजे पुनरुक्ती टळते. त्याचप्रमाणे निवडलेल्या विषयामुळे आपल्या अभ्यासक्षेत्रात, व्यासंगक्षेत्रात किती महत्त्वाचे व दूरगामी परिणाम होतील, ह्या बाबतही स्वतःचे स्पष्ट चिंतन झालेले असावे. आपली आवड, बौद्धिक औत्सुक्य व आपली इच्छा यांना अवसर देणारा असा निवडलेला विषय आहे काय, हे विचारात घ्यावे. तद्वतच विषयासाठी जर थोडेफार वेगळे प्रशिक्षण आवश्यक असेल तर ते आपले झालेले आहे काय? विषयाच्या संशोधनाला लागणारी साधनसामुग्री, आपणांस उपलब्ध आहे काय ? आपली एकंदर परिस्थिती निवडलेल्या विषयाच्या संशोधनास अनुकूल आहे काय ? या सर्व बाबींचा विचार झालेला असणे अवश्य आहे. त्याचप्रमाणे निवडलेल्या विषयाच्या संशोधनाला किती काल म्हणजे वर्षे आपण देणार आहोत, व त्या अवधीत आपण सर्व काम कसे पूर्ण करणार आहोत, या गोष्टीकडेही आपले लक्ष असावे.

संशोधन म्हणजे एक कंटाळवाणे काम असावे असे नाही. याचा अर्थ संशोधनविषय हा अभ्यासकाच्या स्वाभाविक औत्सुक्यातून निर्माण झालेला असला पाहिजे. बौद्धिक व्यवहारात औत्सुक्य ही एक प्रभावी प्रेरणा असावी. आपण निवडलेला हा शोध-योग्य आहे की नाही हे पाहावे. विषय आवडीचा असावा, त्यामागे एखादे उद्दिष्टही असावे, पण प्रत्येक बाबतीत विषय का निवडला हे सांगताच आले पाहिजे असे नाही. तो विषय आपणांस आवडला म्हणून घेतला, एवढे सांगता आले तरी पुरे. म्हणजे विषय हा आपल्या आवडीनिवडी व्यासंग परिस्थिती यांना मिळताजुळता असावा. एखादेवेळी मागे एकदा आवडलेला पण मागे पडलेला असा विषयही पुनः नव्याने आपले मन ओढून घेईल. त्यात अस्वाभाविक असे काही नाही.

पाहा : कोठे वाचावे ? प्रकारची पुस्तके; प्राथमिक वाचन : वाचन पद्धती, प्रकार; शोधक्रियेतील प्रमुख टप्पे; साधनसाहित्य परिशोध.

डॉ. दु. का. संत यांचे ग्रंथलेखन

* । **साहित्य आणि संस्कृति** । प्रकाशन–वर्ष १९५०, किंमत ३ रु.

प्रकाशक : प्रा. दु. का. संत – आकार ५"×७½"; पृष्ठे १६६+१९ आचार्य शं. द. जावडेकर यांची विस्तृत विवेचक प्रस्तावना.

या पुस्तकात, मानवी संस्कृतीबरोबर साहित्य कसे विकसित होत आलेले आहे व ते होत असताना त्याने मानवी संस्कृतीच्या विकासास कसा हातभार लावलेला आहे, ह्याची चर्चा आली आहे. हे लहानमोठे चार स्वतंत्र निबंध आहेत.

या पुस्तकास मुंबई विद्यापीठाचे त्या वर्षीचे तर्खडकर ग्रंथ परितोषिक मिळाले आहे.

* । **मराठी स्त्री** । प्रकाशन–वर्ष १९५७, किंमत १० रु.
प्रकाशक : स्कूल आणि कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर – आकार ५" × ७½"
पृष्ठे : खंड १ : २५८ + खंड २ : ३५४ + १६ [एकूण ६२८] दोन्ही खंड एकत्र.
डॉ. के. ना. वाटवे यांचा 'आशीर्वाद'

लेखकाच्या पीएच्. डी. प्रबंधापैकी प्रमुख भाग. – ह्या ग्रंथात ब्रिटिश राजवटीतील मराठी साहित्यात स्त्रीजीवनाचे जे प्रतिबिंब पडले आहे, त्याची चिकित्सक पाहणी आली आहे. विचारप्रधान वाङ्मय व कादंबरी ह्या दोन वाङ्यप्रकारांची यादृष्टीने चिकित्सा केली आहे. [काव्य, कथा व नाटय यांवरील विवेचन अप्रकाशित आहे.]

या ग्रंथास मुंबई विद्यापीठाचे त्या वर्षाचे तर्खड ग्रंथ परितोषिक मिळाले आहे.

* । **साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न** । – प्रकाशन-वर्ष १९६०, किंमत ३ रु. ५० पैसे

प्रकाशक : पुणे विद्यार्थी गृह, पुणे ३०. आकार ५" × ७½" पृष्ठे १२०+१८.
प्रा. रा. श्री. जोग यांचा 'धन्यवाद' पूर्वक पुरस्कार.

महाराष्ट्र राज्य स्थापन होण्यापूर्वी झालेल्या साहित्य–संमेलनांच्या अध्यक्षीय भाषणांतून चर्चिलेल्या विविध विचार, प्रश्नांचा चिकित्सक परामर्श घेणारे वेळोवेळी लिहिलेले तीन स्वतंत्र निबंध. शेवटी अध्यक्षीय भाषणांतील विषयांची सूची–

* । **संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग** । प्रकाशन–वर्ष १९६६, किंमत ९ रु.
प्रकाशक–पुणे विद्यार्थी गृह पुणे ३०, आकार ५½"×८½" पृष्ठे २०३ + १६
डॉ. ग. श्री. खैर यांची पुरस्कारयुक्त प्रस्तावना.

संशोधन म्हणजे काय, तद्विषयक संकल्पांची उत्क्रांती, तसेच संशोधन–पद्धती, प्रक्रिया व संबद्ध विषयांची मार्गदर्शक व विवेचक चर्चा करणारा ग्रंथ, मराठीत या विषयाचे विस्ताराने विवेचन करणारा पहिला उपक्रम–

शिवाजी विद्यापीठाने एक हजार रुपयांचे प्रकाशनानुदान या पुस्तकास दिले आहे – साभार उल्लेख–

* । **वाङ्मयीन विद्वत्ता** । –प्रकाशन–वर्ष १९७६, किंमत १२ रु.

प्रकाशक : पुणे विद्यापीठ पुणे, आकार ५½' × ८½' पृष्ठे २२५+१६
पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांची 'पुरस्कार' पर प्रस्तावना.

पुणे विद्यापीठातर्फे, १९७३ मध्ये न. चिं. केळकर व्याख्यानमालेत झालेल्या सहा व्याख्यानांचे विस्तृत संकलन. वाङ्मयीन विद्वत्तेच्या म्हणजे वाङ्मयीन व्यासंगाच्या निरनिराळ्या परिक्षेत्रांचा, विद्वत्ता–जडणघडण व शोधाभ्यास, ह्या दृष्टींनी घेतलेला परामर्श. मराठीतील वाङ्मयीन विद्वतेच्या विकसनाचे समालोचन शेवटच्या व्याख्यानात आले आहे. वाङ्मयाच्या आधाराने विद्वत्ता-शास्त्र म्हणजे स्कॉलरशिप ह्या विद्यापीठसंबद्ध विषयाची चर्चा करण्याचा अभिनव उपक्रम.

* । **स्त्री जीवन : अन्वय आणि अर्थ** । प्रकाशन–वर्ष १९७६, किं. ७ रु.
प्रकाशक : महाराष्ट्र गंथ भांडार, कोल्हापूर, आकार ५½"×८½" पृष्ठे ८०+१२
शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू बॅ. पी. जी. पाटील यांचे विवेचक 'प्रास्ताविक दोन शब्द.' महिला वर्षाच्या निमित्ताने केलेले प्रकाशन.

मानवी संस्कृति–विकासाबरोबर स्त्री–जीवनाची जी चढउतारयुक्त वाटचाल झाली आहे तिचे एक चिकित्सक आरेखन, – त्या आधारे आधुनिक, स्त्री–जीवनविषयक विविध समस्यांचा ऊहापोह–स्त्रीउद्धारकर्त्यांचे एक पुण्य स्मरण–

(ही पुस्तके लेखकाकडेही मिळतील.)

स ह का र्या ने

डॉ. द. का. संत यांनी डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या सहकार्याने केलेले लेखन–

* **केशवसुत :** विवेचक अभ्यास. १९५५
प्रकाशक: मॉडर्न बुक डेपो पुणे– पृ. ९८ केशवसुतांच्या मृत्यूला पन्नास वर्षे झाली. त्यानिमित्त झालेले प्रकाशन–

* ' **कलानीतिवाद** ' १९५१ पृ. ९०
प्रकाशक: स्वाधीन साहित्य संस्था लि. पुणे.
डॉ. के. ना. वाटवे यांचा पुरस्कारवजा परिचय.
एका साहित्यक्षेत्रीय वादाचा परामर्श.

* **मुक्तेश्वरकृत सभापर्व :** विवेचक अभ्यास १९५७ पृ. ८८
प्रकाशक: मॉडर्न बुक डेपो पुणे २

* **नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवर :** विवेचक अभ्यास १९५७ पृ. ८०
प्रकाशक: मॉडर्न बुक डेपो पुणे २.
(प्राचीन कवींच्या काव्याचे रसग्राही विवेचन)
(* पुस्तके उपलब्ध नाहीत)

आ गा मी प्र का श न

प्रस्तुत – **शब्दविज्ञान कोश**

म रा ठी व्या क र ण को श.
मराठी व्याकरणविषयक विविध वादस्थळांचा, संज्ञांचा विषयांचा सकलक परिचय, परामर्श–

सौं द र्य शा स्त्र प्र वे श.
ललितकला व वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सौंदर्यशास्त्रीय संकल्पना व विषय यांचे सुगम विवेचन —

म रा ठी ओवी (दुसरी आवृत्ती)

शोधविज्ञान कोश

या प्रयोजित कोशग्रंथाचे प्रकल्पक व लेखक

डॉ. दुर्गादास काशीनाथ संत

हे आपल्या विद्यापीठीय परीक्षांतील उच्च यशाने व मागे उल्लेखिलेल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनामुळे महाराष्ट्रास सुपरिचित आहेत.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्राध्यापनाचा, तसेच संशोधन–मार्गदर्शनाचा दीर्घकालचा अनुभव त्यांना आहे.

त्यांच्या प्रकाशित व संकलित ग्रंथांचे विषय तत्त्व–विवेचन (अॅकॅडेमिक) आणि सामाजिक अशा दोन्ही दृष्टींनी महत्त्वाचे आणि नाविन्यपूर्ण आहेत.
विशेषतः त्यांनी आपल्या

I संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग I आणि
I वाङ्मयीन विद्वत्ता I

या ग्रंथांच्याद्वारे संशोधनशास्त्र व विद्वत्ताशास्त्र (स्कॉलरशिप) हे परस्परसंबद्ध नवे विषय मराठीच्या प्रवाहात आणून सोडले आहेत.
विद्वत्तेच्या संस्थापनाच्या दृष्टीने हे ग्रंथरूप नवे चिंतन अत्यंत लक्षणीय असे आहे.
प्रस्तुत ग्रंथाने व त्याच्या प्रस्तावनेने या विद्वत्ताचर्चेला एक प्रकारची मौलिकता-परिपूर्णता प्राप्त होणार आहे.

भावी अध्येत्यांच्या (स्कॉलर्स) बौद्धिक जडणघडणीच्या दृष्टीने डॉ. संतांचे हे सारे प्रयत्न अतिशय परिपोषक असेच आहेत.
हा सारा उपक्रम एकाकी असला तरी उपेक्षणीय खास नाही.
विद्यापीठांनी तरी त्याची दखल घ्यायलाच हवी.
त्यांचे हे काम आहे–